टेंडर नोटीस

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोल्हापूर यांचे कागल हातकणंगले पंचतारांकित एम आय डी सी व गडमुडशिंगी पशुखाद्य कारखाना येथील दि.०१.११.२०२६ ते दि.३१.१०.२०२७ या कालावधीतील कच्च्या मालाचे रिकामे होणारे जुने ज्युट व एच डी पी ई बारदान विकीसाठी सिलबंद टेंडर्स मागविणेत येत आहेत.

नियम व अटीसह कोरे टेंडर फॉर्म रू.३,000/- अधिक जी.एस.टी. खालील पत्त्यावर रोखीने भरून दि. 0७.११.२0२६ ते दि. १६.११.२0२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. तरी इच्छुक पाटर्यानी त्यांची सिलबंद टेंडर्स बयाना रक्कम रू. सहा लक्ष इतकी कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेच्या कोल्हापूर देय डी डी ने भरून खालील पत्त्यावर दि. १७.११.२0२६ इ. रोजी सायंकाळी ४.00 पर्यंत पोहोच करावीत. कोणतेही कारण न देता, कोणतेही एक किंवा सर्व टेंडर्स स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संघाने राखून ठेवला आहे.

कार्यकारी संचालक अध्यक्ष

प्राधिकृत अधिकारी मंडळ

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.,कोल्हापूर

श्री महालक्ष्मी पशुखाद्य कारखाना, प्लॉट नं. बी - ३,

कागल हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र,

जि.कोल्हापूर - ४१६ २३६

फोन नं. 0२३१ - २६८३६0५

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोल्हापूर (पशुखाद्य कारखाना)

जुने रिकामे ज्युट व एच डी पी ई बारदान विक्री टेंडर फॉर्म

(दि.०१.११.२०२६ ते दि.३१.१०.२०२७ कालावधीसाठी)

१. टेंडर भरणाऱ्याचे नांव ः

२. टेंडर भरणारी व्यक्ती भागीदारी कंपनी असलेस भागीदारांची पूर्ण नांवे व पत्ते ः

३. जी.एस.टी. नंबर ः

४. फोन नंबर ः

५. कंपणी भागीदार असलेस टेंडर भरणेचे व करारावर सह्या करणेचे ज्या भागीदारास अधिकार दिले आहेत त्यांचे नांव (अधिकार पत्र व सहीचा नमुना सोबत जोडावा.) ः

६. बयाना रक्कम भरलेची पावती नं. व दिनांक ः

७. बयाना रक्कम आर.टी.जी.एस.द्वारे भरली असलेस यु.टि.आर नं. ः

८. जुने रिकामे ज्युट व एच डी पी ई बारदान दर रूपये प्रति नग ः
(बारदानाचे दर प्रति नगातच भरावेत)

अ. मोठे रिकामे जुने ज्युट बारदान ः प्रति नग रू. अधिक टॅक्स

ब. लहान रिकामे जुने ज्युट बारदान ः प्रति नग रू. अधिक टॅक्स

क. रिकामे जुने एच डी पी ई बारदान ः प्रति नग रू. अधिक टॅक्स

टेंडरधारकाची सही व शिक्का

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोल्हापूर (पशुखाद्य कारखाना)

जुने रिकामे ज्युट व एच डी पी ई बारदान विकी टेंडरचे नियम व अटी

१. जुने बारदान विकी कालावधी दि.०१.११.२०२६ ते दि.३१.१०.२०२७ असा राहील.

२. टेंडर सोबत बयाना रक्कम रू.सहा लक्ष कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या कोल्हापूर देय डी डी ने किंवा आर टी जी एस द्वारे भरणा करणेची असून बयाना रक्कमेशिवाय टेंडर स्विकारले जाणार नाही. डी डी कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोल्हापूर या नांवानेच असावा. डी डी, पशुखाद्य कारखान्यात लेखा विभागाकडे टेंडर जमा करताना स्वतंत्र जमा करावा. टेंडर व डी डी एकाच लिफाप्यातून जमा करून घेतला जाणार नाही.

३. सिलबंद टेंडर्स लिफाप्यावर " रिकामे जुने ज्युट व एच डी पी ई बारदान टेंडर" असा उल्लेख करावा.

४. सिलबंद टेंडर्स श्री महालक्ष्मी पशुखाद्य कारखाना, प्लॉट नं.बी - ३,कागल हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र येथे दि. १७.११.२०२६ इ. रोजी सायंकाळी ४.०० पर्यंत जमा करावीत.

५. मंजुर टेंडर धारकांस कार्यालयीन आदेश दिले नंतर सात दिवसात रू.१००/- स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने बारदान विकी करार करून देणेचा आहे.सात दिवसात स्टॅप पेपरवर करारपत्र करून न दिलेस आपण संचालक मंडळ सभेमध्ये मान्य केलेल्या दराचा ठेका स्विकारत नाही असे गृहित धरून इतरास ठेका देणेत येईल. अशा परिस्थितीत आपली बयाना रक्कम रू.सहा लक्ष संघाकडे जमा (जप्त) करणेत येवुन परत केली जाणार नाही.

६. मंजुर टेंडर धारकांची संपुर्ण टेंडर अथवा टेंडरचे भागासाठी बयाना रक्कम रू.सहा लक्ष संघाकडे सुरक्षा अनामत म्हणून वर्ग करणेत येईल व सदरची सुरक्षा अनामत रक्कम रू.सहा लक्ष करार कालावधीतील काम समाधान कारक पूर्ण झाले नंतर टेंडर धारकांचे लेखी मागणीनंतर बिनव्याजी चेकने परत केली जाईल.

७. मंजुर टेंडर धारक यांनी दि.०१.११.२०२६ इ. पासून श्री महालक्ष्मी पशुखाद्य कारखाना, प्लॉट नं. बी - ३, कागल हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र व महालक्ष्मी पशुखाद्य कारखाना, गडमुडशिंगी येथे जमा होणार जुने रिकामे ज्युट व एच डी पी ई बारदान पशुखाद्य विभागाचे सुचनेनुसार उचल करणेचे आहे.

८. बारदान उचल करणेपूर्वी सदर बारदानाची टॅक्ससह होणारी संपूर्ण रक्कम मंजुर टेंडर धारकानी पशुखाद्य कारखान्याकडे जमा करणे आवश्यक आहे. बारदानाची होणारी रक्कम भरले शिवाय बारदान उचल करणेस परवाणगी दिली जाणार नाही. तसेच सदर बारदान उचल करणेसाठी भरणी,उतरणी व वाहतुक इ.

२/-

खर्च मंजुर टेंडर धारक यांनी करणेचा आहे. टेंडर कालावधीत बारदान भरणीसाठी प्रति ५० नग बारदान गठठयासाठी वारणी रू.५.00 अशी राहील.

९. मंजूर टेंडर धारकांनी मुदतीत बारदान न उचल केलेस, वारंवार कळवूनही बारदान न उचल केलेस किंवा बारदान उचल करणेचे सोडून दिलेस सुरक्षा अनामत कडे वर्ग करणेत आलेली बयाना रक्कम रू.सहा लक्ष जप्त केली जाईल.

१0. टेंडरचा कालावधी संपलेनंतर दि.३१.१0.२0२७ अखेरचे शेवटी शिल्लक असणारे सर्व बारदान एक महिन्याचे कालावधीत म्हणजेच दि.३0.११.२0२७ पर्यंत उचल करणे आवश्यक आहे. तसे न केलेस गोडावून भाडे वसूली बाबत अथवा दंडात्मक कारवाई करणे बाबत विचार केला जाईल.

११. संचालक मंडळ सभेतील निर्णयानंतर टेंडर बाबतचा अंतिम निर्णय ६0 दिवसापर्यंत घेतला जाईल व त्यानंतरच नामंजुर टेंडर धारकांची टेंडर सोबत भरणा केलेली बयाना रक्कम बिन व्याजी परत केली जाईल. बयाना रक्कम परत मिळणेसाठी टेंडर धारकांनी पशुखाद्य कारखान्याकडे लेखी अर्ज मुळ बयाना पावतीसह सादर करणेचा आहे. टेंडर धारकाकडून बयाना रक्कम भरलेली मुळ पावती हरवलेस टेंडर धारक यांना इण्डेम्निटी बॉड दिले नंतरच बयाना रक्कम परत केली जाईल.

१२. टेंडर धारकांनी त्यांनी दिलेल्या दराबाबत मा. संचालक मंडळ सभेत चर्चा करणेसाठी स्वखर्चाने कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.,कोल्हापूर, प्लॉट नं.बी - १, एम आय डी सी, गोकुळ शिरगांव कार्यालयात हजर राहणेचे आहे. चर्चेसाठीची तारीख व वेळ टेंडर धारकांना आगावू कळविणेत येईल.चर्चे साठी टेंडरवर ज्यानी सही केली आहे त्यांनीच हजर राहणेचे आहे. जर टेंडरवर ज्यांनी सही केली आहे ते हजर राहू शकत नसलेस त्यांनी आपला अधिकृत प्रतिनिधी तसे अधिकार पत्र देवून दुसरे प्रतिनिधी पाठविणेत यावा. अधिकार पत्रावर प्रतिनिधी यांची नमुना सही असणे आवश्यक आहे.

१३. बारदान विकी निर्णय घेणेसाठी कोणतेही टेंडर धारक अथवा त्यांचे प्रतिनिधी चर्चेस उपस्थित न राहिलेस बारदान विकीचा अंतिम निर्णय मा.संचालक मंडळ सभेत घेणेत येईल. अशा प्रकारे बारदान विकीचा झालेला निर्णय मंजुर टेंडर धारकांस दोन महिन्यात कळविणेत येईल.असा निर्णय मंजुर टेंडर धारकास बंधनकारक राहील.

१४. करार कालावधित शासकिय नियमामध्ये कोणताही बदल झालेस सदरचा झालेला बदल टेंडर धारकांना बंधनकारक राहील. मंजूर टेंडरधारकाकडून शासकिय नियमाप्रमाणे टॅक्स वसूल करणेत येतील.सर्व कायदेशीर बाबी कोल्हापुर जिल्हा न्यायालया अंतर्गत राहतील.

१५. आर.टी.जी.एस. तपशिल

1.	Name of Bank	: RBL Bank
2.	Branch	: Shahupuri, Kolhapur
3.	Bank Account No.	: 309005022605
4.	IFSC	: RATN0000001
5.	Name	: Kolhapur Zilla Sahakari Dudh Utpadak Sangh Ltd.

१६. मंजूर टेंडर धारक संघाचे "ब" वर्ग सभासद होणे आवश्यक आहे.

कोणतेही कारण न देता, कोणतेही एक किंवा सर्व टेंडर्स स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संघाने राखून ठेवला आहे.

वरील सर्व नियम व अटी आम्हास मान्य आहेत.

दि.

टेंडर धारक सही व शिक्का